# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## आपत्कालीन व्यवस्थापन खर्च सन.2019-20 अंतर्गत

## जाहिर नोटीस क्रमांक : 05 / सन.2019-20

सार्वजनिक बांधकाम विभाग/ जाहीर नोटीस जाहिरात क्र.05 दिनांक- / /2019

मा.उपायुक्त,अहमदनगर महानगरपालिका हे **आपत्कालीन व्यवस्थापन खर्च सन.2019-20 अंतर्गत** खालील नमुद विविध विकास कामांसाठी व्दि – लिफाफा ( पेटी ) पध्दतीने **B -1** निविदा मागवित आहे. निविदे बाबतच्या या व्यतिरिक्त असलेल्या अटी व शर्ती निविदा फॉर्म मध्ये नमुद केल्या असुन निविदा फॉर्म विक्री व निविदा प्रक्रियेबाबतचा तपशिल खालिल प्रमाणे.

| Sr.No | Envelopes | Start Date & Time | Expiry Date & Time |
|---|---|---|---|
| 1 | निविदा विक्री | 01- 0 8 -2019 10:00 | 07 -0 8 -2019 14:00 |
| 2 | निविदा स्विकृती | 02 -0 8 -2019 14 :00 | 08 -0 8 -2019 17:45 |
| 4 | तांत्रिक लिफाफा उघडणे | 09 – 0 8 -2019 10:00 | 09 -0 8 -2019 17:45 |
| 5 | व्यापारी लिफाफा उघडणे | 13-0 8 -2019 10:00 | 13- 08 -2019 17:45 |

| अ. नं | निविदा क्रमांक | लेखाशिर्ष | कामाचा तपशिल | कामाची निविदा रक्कम (G.S.T.व्यतिरिक्त) | निविदा संच किंमत( ना परतावा) (G.S.T.सह) | बयाना रक्कम | कामाची मुदत | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | सा बां.वि/ जाहीर निविदा क्र.6 / 2019-2020 | | अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी यशोदानगर येथील विहिरीतील गाळ गणेश विसर्जनापुर्वी व विसर्जना नंतर काढणे तसेच विसर्जन गणपती प्रवरा संगम येथे टाकणे. | 1,61,661/- | 590 | 1620/- | 1 महिने | वर्ग 9 व त्यावरील |

**अटी - शर्ती**

1) संबधीत ठेकेदाराने निविदे सोबत योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
2) सदर कामाबाबत निविदा अटी शर्ती इ बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये (बी-1 फॉर्म) व जाहिर टेंडर नोटीसमध्ये नमुद आहे.
3) सदर कामाची निविदा संच खरेदी किंमत व बयाणा रक्कम ईत्यादी बाबत सामान्य पावतीने भरणा करणे आवश्यक आहे.
4) वरील निविदा सादरीकरण / स्विकृती करणे कामी फक्त पेटी पध्दतीने शहर अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे दालनात करावे.
5) निविदा सादरीकरण हे दोन पाकीट पध्दतीने (Technical व Commercial bid) करणे आवश्यक असुन निविदाकाराने दोन पाकीट पध्दतीने (Technical व Commercial bid) ची पाकीटे एका मोठ्या पाकीटात एकत्रीत देणे आवश्यक आहे.
6) मा.शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सीएटी 2017/प्र.क्र.103/इमा.2, मंत्रालय, मुंबई – 32 दि.23/07/2018 अन्वये मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व नोंदणीकृत ठेकेदार पात्र राहतील.
7) **<u>सिलबद तात्रिक लिफाफा क्र. 1</u>** मध्ये पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
   - अ) योग्य त्या वर्गाची नोंद केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.
   - ब) इनकम टॅक्स प्रमाण पत्र प्रत मागील 3 वर्षाचे आवश्यक.
   - क) ई.पी.एफ.व जी.एस.टी.रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र प्रत.
   - ड) कंत्राटदारानुसार सन.2011-12 ते सन.2016-17 पर्यंतचे ई.पी.एफ. भरणा केलेबाबतचे चलन /तत्सम कागदपत्रे सोबत जोडणे अनिवार्य किंवा उपरोक्त कालावधीत मनपाकडे कामे केलेली नसल्यास त्याबाबतचे नोटरी पब्लिक यांचे कडील रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञा पत्र जोडणे अनिवार्य.(सोबत नमुना 'ब')
   - इ) मागील 3 वर्षात हाती घेतलेल्या व पूर्ण केलेल्या कामांच्या किंमतीसह माहितीचा तपशिल कागदपत्रे फॉर्म नं. I. मध्ये सादर करणे क्रमप्राप्त आहे.
   - ई) उपलब्ध मशिनरीच्या मुळ कागदपत्रांची माहिती फॉर्म नं II भरुन जोडण्यात यावी.
   - फ) नमुना ' क ' नुसार रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर मा. तहसिलदार / नोटरी पब्लिक यांचे कडील प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.
   - ग) मागील 3 वर्षामध्ये समकक्ष कामे केलेल्या कामांची यादी फॉर्म नं. III
   - घ) सदरच्या कामाकरीता उपलब्ध असलेल्या कर्मचारी यांची यादी फॉर्म नं. V वरील प्रमाणे निविदा संचामधील फॉर्म नं. I ते III व V मध्ये व Declaration Of The CONTRACTOR वर माहिती भरुन स्वाक्षरी करुन त्याची प्रत सोबत जोडावी.

च) तांत्रिक लिफाफ्यासोबत सदर कामाची बयाना रक्कम व कोरे टेंडर फॉर्म फी भरल्याची सामान्य पावतीची छायांकित प्रत जोडून त्याचा तपशिल तांत्रिक लिफाफयावर नमुद करणे आवश्यक आहे

छ) तांत्रिक लिफाफा क्र. 1 मध्ये जोडलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबत निविदे मध्ये दिलेल्या नमुण्यात रु. 100/- च्या स्टम्प पेपरवर मा. तहसिलदार / नोटरी पब्लिक यांचे कडील प्रतिज्ञा पत्र निविदा नोटीस प्रसिध्दीच्या दिनांकापासुन 90 दिवसाचे आतील तारखेची जोडणे आवश्यक आहे. यशस्वी ठेकेदारास मुळ प्रत कार्यारंभ आदेशापुर्वी देणे बंधनकारक राहील. (सोबत नमुना 'अ')

**ज ) उपरोक्त कागदपत्रे वरीलप्रमाणे अनुक्रमांकानुसार सिलबद तात्रिक लिफाफा क्र .1मध्ये_ अनुक्रमणिका व पान नंबर टाकुण द्यावित .**

**झ ) भुमिईगत कामे झाल्याचा आभिप्राय मिळालेनंतर( भुयारी गटर योजना व फे टु पाणी पुरवठा योजना) गटर, कॉंक्रीटीकरण, पेव्हिग ब्लॉक बसविणे ड्रेनेज लाइन टाकणे इत्यादी कामे कामाचे कार्यादेश देण्यात येतील या अटीवर टेडर भरावेत.**

<u>**सिलबंद दराचा लिफाफा क्र 2**</u> मध्ये संबंधीत ठेकेदाराने निविदा संचामधील <u>Tender for Works</u> वर दर नमुद करुन स्वाक्षरीसह सोबत जोडणे आवश्यक आहे.

8) अटीयुक्त निविदा विचारात घेतली जाणार नाही

9) यशस्वी ठेकेदारास योग्य किंमतीच्या स्टम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

10) यशस्वी ठेकेदारास कामगार विमा सादर करावा लागेल.

11) यशस्वी ठेकेदारास कामापोटी **2.5%** (टक्के) अनामत रक्कम रोखीने भरावी लागेल किंवा कार्यारंभ आदेश पुर्वी सेव्हिंग बॅक डिपॉझिट गव्हर्रमेंट प्रॉमिसरी नोटस किंवा नॅशनल सेव्हिंग सर्टीफिकेट अथवा एफ.डि.आर. स्वरुपामध्ये महानगरपालिकेच्या नांवे करुन दिलेल्या असल्यास स्विकारण्यात येईल.व उर्वरीत रक्कम बिलातुन वसुल करण्यात येईल

12) कुठलेही साहीत्य मटेरीयल महानगरपालिका पुरविणार नाही.

13) सर्व साहीत्य भारतीय रस्ते माणकाप्रमाणे असणे आवश्यक आहे वरील कामासाठी वापरण्यात येणारे साहीत्य (मटेरीयल) योग्य असल्याबाबतचा प्रयोगशाळेकडील अहवाल मा.प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन,अहमदनगर यांचे कडील अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.

14) सदर कामांकरीता आवश्यक सिमेंट / स्टील / डांबराचे मुळ बीलाची छायांकीत प्रत देयकासोबत जोडणे बंधनकारक.

15) टेंडर मधील दर टेंडर उघडलेपासुन 180 दिवस ग्राह्य राहतील.

16) मा.शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण -2017/सी.आर.121(II)/बीड-2 दि.04/09/2017 मंत्रालय, मुंबई – 32 नुसार **प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या 1% एवढया रकमेची राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बैंकेचा डिमांड ड्राफ्ट/एफ.डी.आर. /बॅंक गॅरंटी परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून दराच्या व्यापारी लिफाफ्यासोबत देणे तसेच सिलबंद लिफाफ्यामधुन कंत्राटदारांनी निविदा स्विकृतीच्या दिनांकापासुन 5 कामकाजाचे दिवसाचे आत (Within 5 Working Days) शहर अभियंता यांच्या कार्यालयात जमा करावा.**लिफाफ्यावर कामाचे नांव व ई निविदा क्रमांक लिहिण्यात यावा. (उदा 1% ते 10% कमी दर - 1% रक्कम)तसेच शासन निर्णय क्र.3.प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 10% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार 10% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेची बॅंक गॅरंटी वरील नमुद प्रमाणे सादर करावी. (उदा 14% कमी दर - 10% पर्यंत करिता 1 टक्का व (14% -10%) - 4% असे एकुण 5%) व सदर अनामत रक्कम कामाचा दोष दायित्व कालावधी संपल्यानंतर परत करण्यात येईल.

17) सदरच्या कामांवरील साहित्याचे सक्षम प्राधिकरणाचे गुणवत्ता प्रमाणपत्र **(Test Report)** सादर करणे बंधनकारक आहे.

18) **कामाचा दोष दायित्व कालावधी 6 महिन्यांचा राहील.**

19) कोणत्याही परिस्थीतीत भाववाढ देय असणार नाही

20 निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्विकृती च्या शेवटच्या दिवशी सादरीकरण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील.

21) **निविदा धारकाने तांत्रिक लिफाफ्यात संपुर्ण कागदपत्रे दाखल करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा उघडण्यात आल्यानंतर तपासणीअंती निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केले नसल्यास सदर निविदा नाकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

22) निविदा उघडण्याच्या अखेरच्या दिवशी कार्यालयीन सुट्टी असल्यास निविदा पुढील कार्यालयीन दिनांकास उघडण्यात येईल.

23) कामाचे देयक उपलब्ध निधी प्रमाणे प्रदान करण्यात येईल ही अट मान्य असणा-यांनीच निविदा दाखल करावी.

24) सर्व शासकीय कपाती निविदाधारक यांनी सोसावयाच्या आहेत.( वित्त विभागाचे परिपत्रक क्र.जी.एस.टी.1017/ प्र.क्र.81/कराधान-1दि.19/08/2017 प्रमाणे.)

25) कोणतीही निविदा स्वीकारणे,नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार संबंधित अधिका-यांस राहील.

| प्र.उप आभियंता | प्र.शहर आभियंता | उपायुक्त |
|---|---|---|
| अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर | | अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर |

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**आपत्कालीन व्यवस्थापन खर्च सन.2019-2020 अंतर्गत**

जाहिर - निविदा क्र. ०-५ /सन.२०१९ - २०२० ची निविदा सुचना

आपत्कालीन व्यवस्थापन खर्च सन.2019-2020 अंतर्गत 1 कामांची जाहिर - निविदा क्र. ५ / सन.२०१९-२०२० द्विलीफाफा पध्दतीने (पेटी पध्दतीने) मागविणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या www.amc.gov.inया वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

प्र.उप अभियंता प्र.शहर अभियंता उपायुक्त

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रत : १) प्रसिध्दी अधिकारी,प्रसिध्दी विभाग, म.न.पा.अ.नगर यांना सदर जाहिर निविदा बाबतची सुचना वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेसाठी २ प्रती मंजूर रिपोर्टच्या छायांकित प्रतीसह

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**आपत्कालीन व्यवस्थापन खर्च सन.2019-2020 अंतर्गत**

जाहिर - निविदा क्र. ०-५ /सन.२०१९ - २०२० ची निविदा सुचना

आपत्कालीन व्यवस्थापन खर्च.- सन.2019-2020 अंतर्गत 1 कामांची जाहिर - निविदा क्र. ५ / सन.२०१९-२०२० द्विलीफाफा पध्दतीने (पेटी पध्दतीने) मागविणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या www.amc.gov.inया वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

उपायुक्त

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रत : १) प्रसिध्दी अधिकारी,प्रसिध्दी विभाग, म.न.पा.अ.नगर यांना सदर जाहिर निविदा बाबतची सुचना वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेसाठी २ प्रती मंजूर रिपोर्टच्या छायांकित प्रतीसह